# प्रेसनोट ता.२५/१२/२०१९

## घरफोडी चोरी करणा-या सराईत गुन्हेगारास अटक करुन सुमारे दोन लाखाचा सोन्याचाऐवज जप्त

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात घडणा-या घरफोडी चोरी गुन्हयांबाबत मा.पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई यांनी विशेष सुचना देवून चोरटयांचा शोध घेवून कारवाई करणे बाबत आदेशीत केले आहे. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड व पथक पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणेंकडे दाखल गुन्हयांचा समांतर तपास करत असतांना पिंपरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ७४/२०१९ भा.द.वि कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे दाखल घरफोडी गुन्हयात कुलूप तोडून घरातील लोखंडी कपाटातील ६५०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेला होता. त्याबाबत पोलीस हवालदार स्वामी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी सराईत घरफोडी चोरीचे गुन्हे करणारा गुन्हेगार सुनिल मल्हारी तलवारे रा.मुळ उदगीरता.उदगीर जि.लातुर सध्या कानेफाटा सातचाळ वडगाव मावळ यानेच सदरची चोरी केल्याची माहीती मिळालेने त्याचा चाकण परिसरात शोध घेवून तो साने चौक चिखली येथे येणार असल्याची माहीती मिळालेने युनिट २ च्या पथकाने सापळा लावुन चोरटा सुनिल तलवारे हा पोलीस आल्याची चाहूल लागल्याने पळुन जात असतांना त्याचा पाठलाग करुन शिताफीने अटक केली. त्यास गुन्हे शाखा कार्यालयात आणुन चौकशी करता त्याने नमुद गुन्हयाची तसेच चिचंवड पोलीस ठाणे व वडगाव मावळ पोलीस ठाणेकडे नोंद असलेल्या इतर दोन गुन्हयाची कबुली दिली त्याचेकडून नमुद गुन्हयामधील चोरीस गेलेला एकूण सुमारे २ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे- चांदीचे दागीने व इतर ऐवज जप्त करण्यात आला आहे. आरोपी सुनिल मल्हारी तलवारे हा सध्या पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असुन त्याने अशा प्रकारे आणखीन काही गुन्हे केले आहेत काय या अनुषंगाने तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, सह पोलीस आयुक्त श्री प्रकाश मुत्याल, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, संजय

पंदरे, पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, वसंत खोमणे, मपोहवा उषा दळे, पोना विपूल जाधव, पोकॉ नामदेव कापसे, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,नामदेव राऊत, यांचे पथकाने केली आहे.